<u>“रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत भरडधान्य “मका” खरेदीबाबत”...</u>

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः खरेदी - १०१८ /प्र.क्र.१८२ / ना.पु.२९

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २४ मे, २०१९.

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय क्रमांक: खरेदी १११५/प्र.क्र.१७/ना.पु.२९, दि.१४ .०१.२०१६.

२) शासन शुद्धिपत्र क्रमांक : क्र. १०१४/२८/प्र.क्र. १७/नापु २९ दि. ०३.११.२०१७

३) शासन निर्णय क्रमांक: खरेदी १०१८/प्र.क्र.१८५/ना.पु.२९, दि. २९ सप्टेंबर, २०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून शेतकऱ्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डिस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये, म्हणून ही योजना राज्यात राबविण्यात येते. त्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या अभिकर्ता संस्थांमार्फत (बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व आदिवासी क्षेत्रात, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक) राज्यात एफ.ए.क्यु. (Fair average quality) दर्जाच्या धान व भरडधान्याची खरेदी करण्यात येते.

प्रत्येक हंगामात धान/ भरडधान्य खरेदी करण्याबाबत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील धान/भरडधान्य खरेदीबाबत सूचना निर्गमित करण्यात येतात. हंगाम २०१८-१९ मधील धान/भरडधान्य खरेदी संदर्भातील सूचना शासन निर्णय क्रमांक: खरेदी१०१८/प्र.क्र.१८५ /ना.पु.२९, दि.२९ सप्टेंबर, २०१८ निर्गमित करण्यात आल्या आहेत.

पंरतु, राज्यात यापूर्वी रब्बी हंगामामध्ये खरेदी केली जात नव्हती. तथापि, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये भरडधान्यापैकी मक्याची लागवड केली जात असल्याने रब्बीमध्ये शासनाने मक्याची खरेदी करावी, अशी मागणी मा.लोकप्रतिनिधीकडून करण्यात आली होती. तद्अनुषंगाने यावर्षी प्रथमच रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत “मका” या भरडधान्याची खरेदी केली जाणार आहे. यास्तव मका खरेदीबाबत सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये केंद्र शासनाने किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मका या भरडधान्याचे विहीत विनिर्देश तसेच किमान आधारभूत किंमती जाहीर केल्या आहेत. याशिवाय आधारभूत किंमतींचा शेतकऱ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने व त्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डीस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये, यासाठी राज्य स्तरावर नियंत्रण कक्ष उघडण्याच्या सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार, राज्यातील शेतक-यांना किमान

आधारभूत किंमतीचा लाभ मिळावा या हेतूने राज्यात खरेदी केंद्रे सुरु करण्याकरिता व त्याठिकाणी मका या भरडधान्याची खरेदी करण्यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

१) <u>मका खरेदी बाबत निर्णय:-</u>

अ) संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये केंद्र शासनाची "नोडल एजन्सी" म्हणून भारतीय अन्न महामंडळ (Food Corporation Of India) काम पाहील.

आ) प्रत्यक्ष खरेदीची प्रक्रिया बिगर आदिवासी क्षेत्रात " महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन, मुंबई " व आदिवासी क्षेत्रात "आदिवासी विकास महामंडळ, नाशिक " या अभिकर्ता संस्थांमार्फत करण्यात यावी.

इ) भारतीय अन्न महामंडळाच्या समन्वयाने राज्य शासनाने कार्यवाही करावयाची आहे. यास्तव महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन ,मुंबई व आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांनी राज्य शासनाचे मुख्य अभिकर्ता म्हणून काम पहावे.

ई) मका या भरड धान्याच्या खरेदीच्या स्तरापर्यंतच्या सर्व प्रकारच्या कार्यवाहीची जबाबदारी मुख्य अभिकर्ता संस्थांवर राहील.

उ) खरेदी केलेला मका हे भारतीय अन्न महामंडळाच्या वतीने राज्य शासनाच्या गोदामामध्ये साठविण्यात यावे.

ऊ) मका या धान्याची एकदा खरेदी होवून शासकीय गोदामात मका दर्जा तपासणी व वजन करुन जमा केल्यानंतर, अशा माक्याची साठवणूक, सुस्थितीत ठेवणे, गरजेनुसार जिल्हयांतर्गत वाहतूक / धुरीकरण इत्यादी गोष्टींची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

ऋ) खरेदी झालेला मका खरेदी अभिकर्त्यांनी स्वत:च्या गोदामात किंवा आवश्यकतेनुसार भाड्याच्या गोदामात साठवणूक करुन त्याची भरडाई करावी. केंद्र शासनाने ठरविलेल्या परिशिष्ट " I, , II, III, IV, " मधील विनिर्देशानुसार, शासनाच्या/जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देशांनुसार मका शासनाच्या (जिल्हा पुरवठा अधिकारी) यांच्या गोदामात जमा करावा. मका खरेदीपासून साठवणूक, वाहतूक, सुरक्षितता, तसेच तो जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या गोदामात जमा करण्यापर्यंतची संपूर्ण जबाबदारी अभिकर्ता संस्थांची राहील.

२) <u>अभिकर्ता नेमणूक:-</u>

उपरोक्त निर्णयानुसार, राज्यात खालीलप्रमाणे :-

अ) **बिगर आदिवासी क्षेत्रात** - रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये, किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत मका खरेदी करण्याकरिता, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन, मुंबई या अभिकर्ता संस्थेची या आदेशान्वये मुख्य अभिकर्ता म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. सदर अभिकर्ता संस्थेने या क्षेत्रातील खरेदीची कार्यवाही विहित कालमर्यादेत करण्याची दक्षता घ्यावी.

आ) **आदिवासी क्षेत्रामध्ये** - रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मका या भरड धान्याची खरेदी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या अभिकर्ता संस्थेची या आदेशान्वये मुख्य अभिकर्ता म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. सदर अभिकर्ता संस्थेने या क्षेत्रातील खरेदीची कार्यवाही विहीत कालमर्यादेत करण्याची दक्षता घ्यावी.

३) आधारभूत किंमती, सर्वसाधारण गुणवत्ता व दर्जा:-

पीक		आधारभूत किंमत (रुपये)	शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर (रुपये)
भरडधान्य	मका	१७००	१७००

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत केंद्र शासनाने विहित केलेल्या विनिर्देशात बसणारे FAQ दर्जाचेच भरडधान्य खरेदी करणे आवश्यक आहे. **त्यानुसार अभिकर्ता संस्थांनी प्रशिक्षित ग्रेडर्सकडून तपासणीअंतीच मका खरेदी करावे.** कमी दर्जाचा मका खरेदी झाल्यास व त्यामुळे काही तोटा आल्यास किंवा कोणतीही समस्या उद्भवल्यास त्यासाठी अभिकर्ता संस्था पूर्णत: जबाबदार राहतील.

या धान्याची दर्जात्मक तपासणी शासनाकडून (जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयातील गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षित कर्मचारी) करण्यात येईल. दर्जा संबंधी खरेदी किंवा साठवणूकीच्या वेळी तपासणीमध्ये काही दोष आढळल्यास याबाबत अभिकर्ता संस्था संपूर्णपणे जबाबदार राहील. तसेच यामध्ये प्रकरणपरत्वे सुधारणात्मक कार्यवाही अभिकर्ता संस्थेनेच करावयाची असून अशा कार्यवाहीमुळे झालेल्या नुकसानीस अभिकर्ता संस्था संपूर्णत: जबाबदार असतील.

४) **आर्द्रता :-**

केंद्र शासनाने हंगाम २०१९-२० करीता आर्द्रतेचे अधिकतम **प्रमाण मका या भरडधान्यासाठी १४% इतके** विहित केले आहे. या प्रमाणापेक्षा आर्द्रता जास्त आढळल्यास मका खरेदी करण्यात येऊ नये. कोणत्याही परिस्थितीत जास्त ओलसर किंवा बुरशीयुक्त मका खरेदी करु नये. मका स्वच्छ व कोरडे असून ते विक्री योग्य (मार्केटेबल) असल्याची अभिकर्ता संस्थांनी खातरजमा करावी. विहीत प्रमाणापेक्षा जास्त आर्द्रता असलेले मका खरेदी केल्यास अभिकर्ता संस्थांनी वेळीच संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी.

५) **सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

५.१.खरेदी:-

अ) मार्केटिंग फेडरेशन / आदिवासी विकास महामंडळ यांनी मका खरेदीची योजना त्वरीत कार्यान्वित करावी. त्यासाठी आवश्यक ठिकाणी खरेदी केंद्रे उघडणे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची व्यवस्था करणे, खरेदी केंद्रावर धान्य वाळविणे, स्वच्छ करणे तसेच

धान्याची नासधूस होवू न देणे यासाठी व खरेदी प्रक्रिया सुरळीतपणे होण्यासाठी आवश्यक त्या मूलभूत सुविधा (चाळणी, पंखे, ताडपत्री, पॉलिथिन शिट्स वगैरेसारखी आवश्यक साधने, आवश्यक ती वजनमापे, आर्द्रता मापक यंत्रे (मॉईश्चर मीटर) बारदाना, सुतळी इत्यादी) खरेदी केंद्रावर उपलब्ध करुन देण्याची खबरदारी दोन्ही खरेदी अभिकर्ता संस्थांनी घ्यावी.

आ) खरेदी करावयाच्या मक्याच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री (Image Analysis kit) व पुरेसे प्रशिक्षित ग्रेडर्स नेमण्याची संपूर्ण जबाबदारी मार्केटिंग फेडरेशन / आदिवासी विकास महामंडळ यांची राहील. खरेदी अभिकर्त्यांनी एफ.ए.क्यू. दर्जात न बसणाऱ्या मक्याची खरेदी केली तर त्याची संपूर्ण जबाबदारी व येणाऱ्या नुकसानीची जबाबदारी ही सर्वस्वी खरेदी अभिकर्त्यांवर राहील. कमी दर्जाचे मका खरेदी करण्याचा प्रयत्न केल्यास अशा कर्मचाऱ्यांवर / ग्रेडर्सवर अभिकर्ता संस्थांनी दंडात्मक कारवाई करावी.

इ) आधारभूत किंमत खरेदी योजना ही शेतकऱ्यांच्या हितासाठी असल्याने मका खरेदी करताना या शासन निर्णयातील अनुक्रमांक ७ येथील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

५.२ बारदाना खरेदी:-

अ) दोन्ही अभिकर्ता संस्थांना संपूर्ण हंगामाकरिता लागणारा बारदाना त्यांनी केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावा.

आ) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दराने किंवा प्रत्यक्ष खरेदीसाठी झालेला खर्च, यापैकी जो कमी असेल त्या दराने मक्यासाठी लागणाऱ्या बारदानाची रक्कम अभिकर्ता संस्थांना देय असेल.

इ) मका साठवणूकीकरिता बारदान्याचा वापर करताना काटेकोरपणे केंद्र शासनाचे निकष पाळणे आवश्यक आहे. वापरण्यात येणाऱ्या बारदान्याची प्रत केंद्र शासनाने निश्चित केल्यानुसार नसल्याचे आढळल्यास त्यास अभिकर्ता संस्था जबाबदार राहील, व संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करणे बंधनकारक राहील.

५.३ प्रसिध्दी :-

अ) खरेदी केंद्रावर फक्त खरेदी किंमतीबद्दल दरफलक न लावता किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत असलेले दर्जा, विनिर्देश, खरेदी केंद्रे इत्यादिची माहितीदेखील प्रदर्शित करावी. शेतकऱ्यांना निश्चितपणे लक्षात येण्यासाठी त्यासंबंधातील सूचना केवळ इंग्रजीमध्येच न देता त्या मराठीत अनुवाद करुन देण्यात याव्यात.

आ) एफ. ए. क्यू. दर्जाची मानके ठळकपणे फलकावर प्रत्येक खरेदी केंद्राच्या ठिकाणी प्रदर्शित करण्यात यावीत.

इ) सदर दर, दर्जा, खरेदी केंद्रे दर्शविणारे फलक सर्व कृषि उत्पन्न बाजार समिती, ग्राम पंचायत, तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय इत्यादी ठिकाणी दर्शनी भागावर लावण्याच्या सक्त सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधितांना द्याव्यात.

ई) कोणत्याही परिस्थितीत नॉन एफ.ए.क्यू. दर्जाचे धान्य खरेदी केले जाणार नाही. भरडधान्याचे एफ.ए.क्यू. विनिर्देश, आधारभूत किंमती इत्यादी आवश्यक बाबींना स्थानिक वर्तमानपत्रे व इतर प्रसार माध्यमातून अभिकर्ता संस्थांनी व जिल्हाधिकाऱ्यांनी व्यापक प्रसिध्दी दयावी.

उ) खरेदी केंद्रे व प्रत्येक खरेदी केंद्रास जोडण्यात आलेल्या गावांची नावे यासंबंधी पुरेशी प्रसिध्दी देण्याबाबत जिल्हाधिकारी आणि खरेदी अभिकर्ता संस्थांनी खबरदारी घ्यावी.

ऊ) रोज सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर खरेदी केंद्रावर आणलेले, परंतु खरेदी न झालेले भरडधान्य सांभाळण्याची जबाबदारी संबंधित शेतकऱ्याचीच राहील, अशी व्यापक प्रसिध्दी द्यावी.

५.४ तपासणी:-

अ) भारतीय अन्न महामंडळाचे/राज्य शासनाचे अधिकारी खरेदी केंद्रांना भेटी देऊन नियमितपणे विहित पध्दतीने खरेदी होत आहे किंवा नाही याची तपासणी करतील आणि त्यांनी दिलेला सल्ला विचारात घेऊन खरेदी अभिकर्ता संस्थांनी त्याप्रमाणे सुधारीत कार्यवाही / उपाययोजना करणे आवश्यक राहील. तसेच त्याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल त्या अधिकाऱ्यास तसेच शासनास सादर करणे अभिकर्ता संस्थांना बंधनकारक राहील.

आ) जिल्हाधिकाऱ्यांनी मका खरेदीच्या कालावधीत दर्जा नियंत्रण व दक्षता पथकाची स्थापना करावी. या पथकाद्वारे विशेष मोहिम राबवून नॉन एफ.ए.क्यू. मका खरेदी होण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

इ) ज्या बारदानांमध्ये मका भरलेले आहे, ती बारदाने केंद्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या परिमाणानुसार आहेत अथवा नाहीत याची तपासणी जिल्हा पुरवठा अधिकारी व अभिकर्ता संस्था यांच्या प्रतिनिधींनी एकत्रितरित्या करावी. याबाबतच्या नोंदी खरेदी केंद्रावर जतन कराव्यात. या तपासणीत केंद्र शासनाच्या बारदानांविषयीची नामांकने पूर्ण करत नसलेले बारदाने दिसून आल्यास ती नाकारावीत. कमी प्रतीचे बारदान वापरण्यात आल्याबाबत कोणतीही तक्रार शासनाकडे येणार नाही, याची दक्षता अभिकर्ता संस्थांनी घ्यावी. अशा प्रकारच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्यास त्या आधारे शासनस्तरावरुन तात्काळ तपासणी करण्यात यावी आणि त्या तपासणी अहवालाच्या आधारे अभिकर्ता संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करणे अभिकर्ता संस्थांना बंधनकारक राहील.

ई) दक्षता पथक / जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीचा अहवाल दर आठवड्याला शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

५.५ इतर:-

अ) उपअभिकर्त्यांची नेमणूक खरेदी अभिकर्त्यांने स्वत:च्या जबाबदारीवर करावी. जिल्हाधिकाऱ्यांनी उप अभिकर्त्यांना प्राधिकारपत्रे देऊ नयेत. उप अभिकर्त्याच्या नेमणूकीशी शासनाचा काहीही प्रत्यक्ष संबंध राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

आ) शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या उत्पादनाची महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी (नियमन) नियम,१९६३ च्या नियम ३२ (ड) अन्वये कृषि उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या हमी भावापेक्षा कमी दराने खरेदी केली जाणार नाही, याबाबत बाजार समितीने दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार "बाजार समितीने अशा प्रकारांना आळा घातला नाही तर त्यांच्याविरुध्द उपरोक्त नियमांच्या नियम ४५ अन्वये शासन योग्य ती कारवाई करु शकेल." ही बाब संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या नजरेस आणून द्यावी. किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत जाहीर केलेल्या धान्याचा दर्जा, विहित विनिर्देश व किंमतीबाबतचे फलक ठळक अक्षरात दर्शनी भागात लावण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी कृषि उत्पन्न बाजार समित्यांना सक्त सूचना द्याव्यात व बाजार समित्यांनी त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. एफ.ए.क्यू.दर्जाचा मका हमी भावापेक्षा कमी भावाने व्यवहार होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

इ) पूर्वानुभवानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावाने झालेल्या खरेदी संदर्भात केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे कारणमिमांसा विचारण्यात येते व याबाबत संबंधितांचा खुलासा मागविल्यावर बहुतांशी अशी खरेदी नॉन एफएक्यू दर्जाच्या धान / भरडधान्याची झालेली असल्याचे दिसून येते. मात्र, अशा कमी दराने होणाऱ्या खरेदी व्यवहाराबाबत कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी संबंधिताना खरेदी विक्री दरांची माहिती देताना / अहवाल पाठविताना एफएक्यू / नॉन एफएक्यू दर्जाबाबत विर्निदिष्टपणे माहिती न पुरविल्यामुळे बहुतांशी प्रकरणात केंद्र शासनाकडून राज्याकडे पत्रव्यवहार करण्यात येतो. यास्तव, कोणत्याही बाजार समित्यांनी त्यांच्या क्षेत्रात खरेदी झालेल्या मका या भरडधान्याचे दर कोणत्याही माध्यमाद्वारे प्रसिध्द करताना किंवा कळवितांना खरेदी विक्रीचे दराबरोबरच एफएक्यू व नॉन एफएक्यू दर्जाबाबतसुध्दा कोणत्याही परिस्थितीत उल्लेख करावा अशाही सक्त सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना दयाव्यात.

ई) आधारभूत किंमत योजनेखाली मका खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांना जो अनुषंगिक खर्च द्यावयाचा आहे, त्याबाबत राज्य शासन, केंद्र शासनाशी चर्चा करुन स्वतंत्रपणे निर्णय घेईल व हा निर्णय स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

उ) वरील योजनेंतर्गत खरेदी केलेल्या मक्यातील तूट/ घट केंद्र शासनाने मान्य केला तर त्याप्रमाणातच अनुज्ञेय राहील.

६) **खरेदी केंद्रे:-**

जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देशिल्याप्रमाणे खरेदी अभिकर्ता संस्थांनी आवश्यक त्या ठिकाणी मका या भरडधान्याची खरेदी करण्यासाठी आवश्यकतेनुसार खरेदी केंद्रे उघडावीत. आनावश्यक खरेदी केंद्र उघडली जाणार नाहीत, याची दक्षता संबधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

७) **खरेदी कालावधी**:- भरडधान्य-मका- दिनांक २७ मे,२०१९ ते ३०जून, २०१९

८) **खरेदी पध्दत:-**

I. प्रत्येक गाव एका विशिष्ट खरेदी केंद्रास जोडण्यात यावे. सदर गावातील शेतकरी जर दुसऱ्या खरेदी केंद्रावर मका घेवून गेला तर, त्या केंद्रावर त्याचे मका खरेदी करु नये. खरेदी केंद्रे व प्रत्येक खरेदी केंद्रास जोडण्यात आलेल्या गावांची नावे यासंबंधी पुरेशी प्रसिध्दी देण्याबाबत जिल्हाधिकारी आणि खरेदी अभिकर्ता संस्थांनी खबरदारी घ्यावी.

II. शेतकऱ्यांकडील मका खरेदी करताना Online खरेदी पध्दत सुरु करण्यात आली आहे. त्याकरीता संबंधित शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक राहील. त्याकरिता Online नोंदणी, आधार क्रमांक व बचत बँक खाते क्रमांक नोंदणी करण्यात येत आहे. सदर Online खरेदी करीता NeML NCDEX Group Company यांचे Platform वर नोंदणी करुन केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे त्या नोंदी PFMS (Public Fund Monitoring System) करणे अनिवार्य आहे.

III. शेतकऱ्यांकडील जमिनीबाबतचा ७/१२ चा उतारा पाहूनच मका खरेदी करण्यात यावे. सदरहू उताऱ्यात मक्याखालील क्षेत्रे याची नोंद आहे, याची खात्री करुन घ्यावी. तसेच ७/१२ उताऱ्यासंबंधीची नोंद पावतीच्या मागील बाजूस घ्यावी. ७/१२ उताऱ्याची प्रत शेतकऱ्यांना परत करु नये.

IV. खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणलेल्या मक्याच्या अनुषंगाने Online नोंदी करण्यात याव्यात तसेच गावनिहाय रजिष्टर तयार करावे. त्यामध्ये १) शेतकऱ्याचे नाव २) सर्व्हे / गट क्रमांक व क्षेत्रफळ, ३) केंद्रात विक्रीस आणलेले मका या माहितीचा समावेश असावा. त्यामुळे पुन्हा मका आणल्याबरोबर या नोंदवहीवरुन पूर्वी दिलेला ७/१२ चा उतारा काढून, शेतकऱ्याने आणलेल्या मका त्याच्या स्वत:च्या उत्पादनातील आहे याची खात्री करुन घेता येईल. ट्रकने वा तत्सम वाहनातून आणलेले मका स्विकारण्यापूर्वी सदर मका खऱ्या शेतकऱ्याचेंच आहे याची पूर्णपणे खात्री करुन घ्यावी.

V. काही ठिकाणी धान्याखालील क्षेत्र व सरासरी उत्पादकता याचा विचार न करता फार मोठया प्रमाणावर (अप्रत्यक्षपणे व्यापाऱ्यांचा) मका खरेदी केली जाते असे निदर्शनास आले आहे. यास्तव शेतकऱ्यांचे ७/१२ उताऱ्यानुसार पीकाखालील क्षेत्र, या वर्षीची पिक परिस्थिती (पैसेवारी) पीकाचे सरासरी उत्पादन या बाबी विचारात घेऊन, मका खरेदी करण्यात यावे.

VI. रोज सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर खरेदी केंद्रावर आणलेला, परंतु खरेदी न झालेले मका सांभाळण्याची जबाबदारी संबंधित शेतकऱ्याचीच राहील, अशी प्रसिध्दी द्यावी.

VII. व्यापाऱ्यांकडून गतवर्षीचे मका पुन्हा खरेदी केंद्रावर विकले जाण्याची शक्यता विचारात घेऊन गतवर्षाचे जुना मका कोणत्याही स्थितीत खरेदी केला जाणार नाही व केवळ शेतकऱ्यांकडून उत्पादित झालेले नवा मका खरेदी केला जाईल याची अभिकर्ता संस्थांनी विशेष खबरदारी घ्यावी. जुना किंवा बिगर शेतकऱ्यांकडून मका खरेदी झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी अभिकर्ता संस्थांवर राहील.

९) **<u>खरेदी केलेल्या मक्याची साठवणूक</u> :-**

अ) अभिकर्ता संस्थांनी विनिर्देशानुसार खरेदी केलेला मका हे भरडधान्य राज्य शासनाच्या प्रतिनिधीने, शक्यतो त्याच दिवशी केंद्राजवळच्या गोदामात पूर्ण वजन करुन व दर्जाची खात्री करुन जिल्हाधिकारी यांनी ठरविल्याप्रमाणे ताब्यात घ्यावे व त्याची नोंद गोदाम लेख्यामध्ये नियमितपणे घ्यावी. त्याकरिता आवश्यकता भासल्यास साठवणूकीसाठी वखार महामंडळाची / सहकारी संस्थांची गोदामे भाडयाने घेण्यात यावीत. साठा उघडयावर साठविण्याची गरज उद्भवल्यास तो साठविण्यापूर्वी अशा अन्नधान्याच्या थप्प्याखाली व आजूबाजूस ड्रेनेज पुरवून त्यावरुन पूर्णपणे पुरेशा ताडपत्र्यांनी झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच गरजेनुसार नियमित ठेकेदाराकडून वेळीच धुरीकरण करुन मका किडीपासून संरक्षण करावे. कोणत्याही परिस्थितीत उघडयावर साठविण्यात आलेला मक्याचा साठा पावसामुळे भिजणार नाही व धान्य थप्प्यांना खालून किंवा बाजूने ओल लागणार नाही व पावसाळयात सुध्दा असा साठा उघडयावर राहीला तरी मका खराब होणार नाही याची दक्षता घेवूनच गोदामाबाहेर असलेला मका सुरक्षिततेची प्रथम पासूनच व्यवस्था करावी. याबाबत शासन पत्र, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक : संकीर्ण - १२९८ / १५ / प्र. क्र. २५७९ / ना. पु. २९, दिनांक ३ ऑगस्ट, १९९८ (परिशिष्ट IV) अन्वये विहित केलेल्या संहितेचे कटाक्षाने पालन करण्यात यावे.

आ) जिल्हाधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी मका ताब्यात घेतांना ते FAQ दर्जाचा आहे, याची प्रत्यक्ष खातरजमा करावी. तसेच, याबाबतचे प्रमाणपत्र भारतीय अन्न महामंडळाकडे पाठवावे.

इ) मका खरेदी कालावधी संपल्यानंतर एका आठवडयाच्या आत गोदामनिहाय साठविण्यात आलेल्या (मका) तपशील शासनास सादर करण्यात यावा. यासोबत सदरचे भरडधान्य FAQ दर्जाचे असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत देखील सादर करण्यात यावी.

१०) **मक्याची साठवणूक :-**

अ) मक्याच्या बाबतीत साठवणूकीची जबाबदारी संबंधित अभिकर्ता संस्थांची राहील. खरेदी केलेला मका अभिकर्ता संस्थांच्या ताब्यातच राहील. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे संबंधित अभिकर्ता संस्थांनी गोदामे भाडयाने घ्यावीत. मक्याची साठवणूक, सुरक्षितता, वाहतूक, संबंधित जिल्हाधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी जमा करेपर्यंत सर्व जबाबदारी अभिकर्ता संस्थांची असून ती कामे अभिकर्ता संस्थांनी करावयाची आहेत.

आ) मका खरेदीनंतर विहित कालावधीत जिल्हाधिकारी यांच्या गोदामात जमा करणे, याची संपूर्ण जबाबदारी अभिकर्ता संस्थाची राहील. याबाबत कोणत्याही कारणामुळे विलंब लागल्यास त्या विलंबासाठी होणाऱ्या कारवाईची जबाबदारी अभिकर्ता संस्थाची राहील, याची नोंद घेऊन अभिकर्ता संस्थांनी मक्याच्या दर्जाबद्दल विशेष दक्षता घ्यावी. कलर कोडींग (Colour coding) केलेल्या गोण्या वापरण्याबाबत केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याविषयी **परिशिष्ट "III"** मधील शासन पत्र क्रमांक: संकीर्ण २६१८/प्र.क्र.२३७/नापु-२९, दिनांक १३ नोव्हेंबर,२०१८ नुसार कार्यवाही सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी.

११) **धान्याची किंमत प्रदान करणे व खर्चाची प्रतिपूर्ती:-**

अ) लाभार्थ्याचे प्रदान ऑनलाईन करण्याबाबत केंद्र शासनाचे निर्देश आहेत. ही बाब विचारात घेता अभिकर्ता संस्थांनी त्यांच्या मुख्यालयातून थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये खरेदी केलेल्या मक्याची रक्कम अदा करावी. कोणत्याही परिस्थितीत सदर रक्कम मक्याची खरेदी केलेल्या दिवसापासून पुढील ३ दिवसांपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा झाली पाहिजे.

आ) शासनाच्या अभिकर्ता संस्थांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या मक्याची किंमत शेतकऱ्यांना त्वरित प्रदान करावी. अभिकर्त्या संस्थांना वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या कार्यालयाने, अभिकर्ता संस्थांकडून साप्ताहिक खरेदी विवरणपत्र व धान्य शासकीय गोदामात प्राप्त झाल्याचा पुरावा प्राप्त होताच, खरेदी केलेल्या मक्याची पूर्ण किंमत प्रदान करावी. ही रक्कम विनाविलंब अदा करणे वित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या कार्यालयाला शक्य व्हावे म्हणून मक्याची स्वीकृती पत्रे अभिकर्ता संस्थांनी ताबडतोब दर आठवडयाला वित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या कार्यालयास सादर करावीत.

इ) अभिकर्ता संस्थांनी आधारभूत किंमत योजनेखाली खरेदी केलेल्या मक्याची साप्ताहिक विवरणपत्र जिल्हा पुरवठा अधिकारी/सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे प्रति स्वाक्षरीसह प्राप्त होताच, त्याआधारे वित्तीय सल्लागार व उप सचिव यांनी दोन्ही **अभिकर्ता संस्थांना प्रति क्विंटल १७००/-रुपये प्रमाणे** रक्कम अदा करावी.

मका खरेदी झाल्यानंतर तो शासकीय गोदामात जमा केल्यानंतर अनुषगिक खर्चाची रक्कम केंद्र शासनाचे मंजूरीनुसार आदेश काढल्यानंतर अदा करावी.

ई) अभिकर्ता संस्थांनी या योजनेंतर्गत खरेदी केल्या जाणाऱ्या मक्यासाठी संबंधित शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्याच्या प्रती तसेच इतर मूळ अभिलेखे त्यांच्या कार्यालयात ठेवावे. मक्याची खरेदी प्रदानाच्या संदर्भात अतिप्रदान किंवा चुकीची देयके सादर करुन रकमा अदा केल्या जाणार नाहीत याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्ता संस्थेची राहील. अभिकर्ता संस्थेने या योजनेंतर्गत खरेदी केल्या जाणाऱ्या मक्यासाठी वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयात प्रतिपूर्तीचे दावे सादर करतांना साप्ताहिक खरेदी विवरणपत्र, फॉर्म 'बी' व 'सी' सोबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्र सादर करावे:-

"प्रमाणित करण्यात येते की, दाव्यात दर्शविलेल्या रकमांचे यापूर्वी प्रदान करण्यात आलेले नाही. सदर दाव्यातील परिगणना खरेदी केंद्रे / संबंधित कार्यालयात ठेवण्यात आलेल्या मूळ अभिलेख्यावरुन पडताळणी करण्यात आलेली असून अनुज्ञेय रकमांचे दावे सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रदानात जादाचे किंवा चुकीचे प्रदान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्ता संस्थांची राहील व त्यानुसार वसूल प्राप्त रकमा तात्काळ वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयास परत करण्यात येतील किंवा पुढील दाव्यातून वसूल करण्यात याव्यात."

उ) केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार महिनानिहाय साठा विवरणपत्र , बारदाना लेखे, गोदामभाडे करार, वाहतूक भाडेदरपत्रक इ. आवश्यक दस्तऐवज अभिलेखित करावेत.

ऊ) दोन्ही अभिकर्ता संस्था, आवश्यक असल्यास भारतीय रिझर्व्ह बँकेकडून सवलतीच्या दराने कॅश क्रेडीट लिमिट मिळण्यासाठी प्रस्ताव करु शकतील. (विशेषत: मका खरेदीसाठी) असा प्रस्ताव त्यांनी पाठविल्यास केंद्रीय अन्न मंत्रालयामार्फत अशी कॅश क्रेडिट मिळवून देण्यासाठी हा विभाग शिफारस करेल.

ऋ) अभिकर्ता संस्थांनी आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मक्याची खरेदीबाबतचे स्वतंत्र लेखे ठेवणे व अनुषंगिक माहिती सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या कार्यालयाकडून तात्काळ देण्यात याव्यात.

१२) **कंट्रोल रुम:-**

अ) आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या मक्याचा नियमित अहवाल केंद्र शासन/ भारतीय अन्न महामंडळास पाठविण्याची कार्यवाही वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयामार्फत करण्यात यावी.

सदर योजना राबविताना केंद्रीकृत नियंत्रण रहावे याकरिता खालीलप्रमाणे **कंट्रोल रुमची स्थापना** करण्यात येत आहे.

अवर सचिव, MSP, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार),मुंबई- ४०० ०३२.
E-mail: mankamenetra@gmail.com, netra.mankame@nic.in
Fax no. ०२२ २२७९३०४५

ब) अभिकर्ता संस्थांनी दररोजचा जिल्हानिहाय खरेदी अहवाल सायंकाळी ५.३० पर्यंत वरील कंट्रोल रुमला व वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयास पाठवावा. संबंधित जिल्हाधिकारी व खरेदी अभिकर्ता संस्थांनी दर शनिवारी सायंकाळपर्यंत खरेदी करण्यात आलेल्या भरडधान्य खरेदीचा साप्ताहिक अहवाल **परिशिष्ट "II"** मधील नमुन्यात वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, मुंबई यांच्याकडे पाठवून त्याची प्रत सह सचिव (किमान आधारभूत किंमत योजना) यांना द्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०५२४१६५४४६१२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Food and Civil Supply, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2019.05.24 16:57:54 +05'30'

(सतिश सुपे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- परिशिष्ट I, II, III, व IV

प्रति,

१) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ,कनमुर हाऊस, मुंबई-४०० ००१.
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., आदिवासी विकास भवन,जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००१.
३) जिल्हाधिकारी, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे,पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा मुंबई.
५) जिल्हा पुरवठा अधिकारी,नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.
६) सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे,पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.
७) सर व्यवस्थापक (महाराष्ट्र) ,भारतीय अन्न महामंडळ, ५ वा माळा, दत्तपाडा रोड, राजेंद्र नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई-४०००६६
८) उपआयुक्त (पुरवठा), सर्व विभाग.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

१) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद
२) सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य.
३) अपर मुख्य सचिव, (पणन), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
७) खाजगी सचिव, मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण), मंत्रालय, मुंबई-३२.
८) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती),
९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय ६ वा मजला, विधानभवन, मुंबई. (१० प्रती)
१०) संचालक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई
११) संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.

शासन निर्णय क्रमांक : खरेदी -१०१८ / प्र.क्र.१८२ /ना. पु. २९ दि. २४ मे, २०१९ चे सहपत्र

परिशिष्ट "I"

(**रब्बी पणन हंगाम** २०१९-२० मध्ये खरेदी करावयाच्या मक्याचे विनिर्देश)

ANNEXURE - "I"

UNIFORM SPECIFICATIONS FOR MAIZE.

(RABI MARKETING SEASON 2018-19)

The **Maize** shall be the dried and matured grain of *Zea mays*. It shall have uniform shape and colour. It shall be in sound merchantable condition and also conforming to prescribed norms under Food Safety & standards Act, 2006/Rules prescribed thereunder.

Maize shall be sweet, hard, clean, wholesome and free from *Argemone mexicana* and *Lathyrus Sativus* (khesari) in any form, colouring matter, moulds, weevils, obnoxious smell, admixture of deleterious substances and all other impurities except to the extent indicated in the schedule below :-

SCHEDULE OF SPECIFICATIONS

Sr.No.	Refractions	Maximum Limits (%)
1	Foreign matter*	1.0
2	Other food grains	2.0
3	Damaged grains	1.5
4	Slightly damaged, discoloured and touched grains	4.5
5	Shrivelled & Immature grains	3.0
6	Weevilled grains	1.0
7	Moisture content	14.0

* Not more than 0.25% by weight shall be mineral matter and not more than 0.10% by weight shall be impurities of animal origin.

N.B.

1. The definition of the above refractions and method of analysis are to be followed as given in Bureau of Indian Standard 'Method of Analysis for Food grains' Nos. IS: 4333(Part-I) 1996 and IS: 4333(Part-II) 2002 and ''Terminology for food grains'' IS: 2813-1995 as amended from time to time.

2. The method of sampling is to be followed as given in Bureau of Indian Standard 'Method of Sampling of cereal and pulses' NO.IS:14818-2000 as amended from time to time.

3. Within the overall limit of 1.0% for Foreign Matter, the poisonous seeds shall not exceed 0.5% of which Dhatura and Akra seeds (*Vicia* species) not to exceed 0.025% and 0.2% respectively.

4. The small sized maize grains, if the same are otherwise fully developed, should not be treated as Shrivelled and Immature grains.

शासन निर्णय क्रमांक : खरेदी -१०१८ / प्र.क्र.१८२ /ना. पु. २९ दि. २४ मे, २०१९ चे सहपत्र

परिशिष्ट "॥"

हमी भाव योजनेखाली एफ. ए. क्यू. दर्जाच्या मका खरेदीबाबतचा साप्ताहिक अहवाल

१) जिल्हयाचे नांव: - ----------------------------------

२) मागील शनिवार:- --- (आकडे क्विंटलमध्ये) दिनांक ------------------------अखेर मका.
झालेली एकूण खरेदी एफ. ए. क्यू. ----------------------------

३) मागील शनिवारी दिनांक -----------------------अखेर झालेली एकूण खरेदी.

४) अडचणी असल्यास --

****

शासन निर्णय क्रमांक : खरेदी -१०१८ / प्र.क्र.१८२ /ना. पु. २९ दि. २४ मे, २०१९ चे सहपत्र

परिशिष्ट " III "

(कलर कोडिंग - पणन हंगाम २०१९-२० रब्बीसाठी)

No.15(1)/2012-P.III(Pt2.E.342189).
Government of India
Ministry of Consumer Affairs, Food & Public Distribution
Department of Food & Public Distribution

280 Krishi Bhavan, New Delhi.
Dated #ApprovedDate#

To

The Secretary,
Food & Civil Supplies Department, मा.प्र. अ
Government of Andhra Pradesh, Assam, Bihar, Chhattisgarh, Gujarat, Haryana, Himachal Pradesh, Jammu & Kashmir, Jharkhand, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Nagaland, Orissa, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, Uttaranchal, Uttar Pradesh, West Bengal, Andaman & Nicobar Islands, Chandigarh, Delhi and Pondicherry.

Subject: Colour Coding of Gunny Bags to facilitate identification of crop year of stock for RMS 2019-20.

Sir/Madam,

I am directed to say that it has been decided to adopt **RED** Colour Coding for gunny bags for RMS 2019-20. The colour coding will be in the manner indicated below:

1. Stencil or Branding as per indenters' requirements shall be in "BLUE" colour.
2. Marking or stitching on the mouth of the bag after filling the grain will be done by the FCI/State Agencies in "RED" colour.
3. For identification marking of marketing season, there will be Color Coded strip/s on every jute bag. Width of each strip will be of 4 threads. Each strip will be running along the length of the Bag and shall be in "RED" color.

For bags to be supplied through Jute Commissioner of India.

4. (i) Single strip is to be printed for bags to be supplied through Jute Commissioner of India. This single strip shall be printed at a distance of about 150 mm away from any selvedge of the bag.

(ii) For supply of jute bags to Andhra Pradesh, Telangana, Tamil Nadu, Kerala and Karnataka through Jute Commissioner of India, an additional Black colour strip will be printed on each bag at a distance of about 150 mm away from other selvedge of the bag.

For bags not purchased through Jute Commissioner of India.

5. For jute bags not purchased through Jute Commissioner of India, two strips shall be printed on each bag. Each of two strips shall be printed at a distance of about 150 mm away from the respective selvedges of each bag.

Yours faithfully,

J.S.(S)

25.10.18

Under Secretary
Govt. of India
Deptt. of Food & Public Distribution
Krishi Bhavan, New Delhi

(कलर कोडिंग - पणन हंगाम २०१९-२० रब्बीसाठी)

महाराष्ट्र शासन

तात्काळ/ महत्वाचे

क्रमांक :संकीर्ण २६१८/प्र.क्र.२३७/नापु.२९
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१८.

प्रति,

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.,कनमूर हाऊस,नरसी नाथा स्ट्रीट,मुंबई-४०० ००९.
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक-२.
३) महा व्यवस्थापक (महाराष्ट्र) भारतीय अन्न महामंडळ,५ वा माळा, दत्तपाडा रोड, राजेंद्र नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई -४०००६६.
४) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

विषय :-रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये "Colour Coding" केलेल्या गोण्यांचा वापर करण्याबाबत.

संदर्भ :- भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. 15(1)/2012-PY-III/

खरीप पणन हंगाम २०१९-२० साठी लाल रंगाचे कोडींग केलेल्या (RED Colour Coding) गोण्यांचा वापर करण्याबाबतच्या केंद्र शासनाने उपरोक्त पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे)वर

२ तरी केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये गोण्यांच्या कलर कोडींगबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

निर्गमित
दिनांक १५/११/१८
९३५

(नि.ज.गारोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी:-
१) सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
३) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
४) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
६) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, प्रशासकीय कुटीर कार्यालय क्र.५, कॉंग्रेस जनरल मार्ग, मुंबई.
७) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
८)कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई, ९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०)सर्व कार्यासने,अन्न, नागरीपुरवठा व ग्राहक सरंक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११)कार्यासन नापु.२९ संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक : खरेदी -१०१८ / प्र.क्र.१८२ /ना. पु. २९ दि. २४ मे, २०१९ चे सहपत्र
परिशिष्ट " IV "

क्रमांक:संकीर्ण- १२९८/२८१५/प्र.क्र.२५७९/ना.पु.२९,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३ ऑगस्ट, १९९८.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व अपर जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.

विषय : खुल्या जागेत शास्त्रोक्त पध्दतीने अन्नधान्याची
साठवणूक करण्याबाबत संहिता.

राज्यात वेळोवेळी आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत तसेच लेव्ही आदेशातंर्गत अन्नधान्याचे प्रापण करण्यात येते. अशाप्रकारे खरेदी करण्यात येणारे अन्नधान्य शासकीय किंवा भाडयाने घेतलेल्या गोदामात सुरक्षित साठविण्यात येते. त्या अन्नधान्याच्या सुरक्षिततेविषयी दयावयाच्या खबरदारीची संहिता यापूर्वीच विहित करण्यात आली आहे.

२. काही विशिष्ट परिस्थितीत शासनाच्या ताब्यात असलेले अन्नधान्य गोदामात साठविणे शक्य झाले नाही (गोदामात जागा नसल्यामुळे) व त्यामुळे असे अन्नधान्य खुल्या जागेत (cover and plinth) साठवावे लागल्यास, त्यावेळी संभाव्य नुकसान टाळून अन्नधान्याची शास्त्रोक्त पध्दतीने साठवणूक करण्याबाबतची उपरोक्त उपयोजन संहिता केंद्र शासनाने निश्चित केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे :-

(१) खुल्या आवारात (Cover and plinth) साठवणूकीसाठी निवडलेल्या जागा हया उंच जोत्याच्या, (High Plinth Area) विशेषत: पक्क्या बांधकामाच्या असाव्यात. पुरेसा निचरा होणा-या असाव्यात. जोत्याच्या बांधकामामध्ये तडे गेलेले नसावेत किंवा भेगा नसाव्यात. अशा आवारांच्या सभोवती अनावश्यक रानटी वनस्पती नसाव्यात आणि अशा जागा सुलभ रस्त्यांनी जोडलेल्या व पुरेशा सुरक्षित असाव्यात.

(२) खुल्या आवारातील (cover and Plinth) साठवणूक करताना योग्य ड्रेनेजच्या (लाकडी ठोकळे, दगडी लाद्या, इत्यादी) वापर करावा.

(३) अन्नधान्याचे निरिक्षण करण्यासाठी तसेच कीटकांच्या नियंत्रणाचे उपाय योजण्यासाठी जोत्याच्या भोवती पुरेशा मार्गिका व जागा असाव्यात.

(४) थप्प्या हया प्रमाणशीर आकाराच्या, उंचीच्या आणि घुमटाकार असाव्यात. त्यामुळे आवरणाचा फुगा होणे (Ballooning of Cover) तसेच थप्प्याच्या वर पाणी साठणे टाळता येईल.

(५) उंदिराच्या बंदोबस्ताची काळजी वेळच्यावेळी घेण्यात यावी. उंदीर नियंत्रणासाठी ॲल्यूमिनियम फॉस्फाईडच्या गोळयांच्या (०.६ ग्रॅमच्या दोन गोळया प्रत्येक जिवंत बिळासाठी) वापर करावा. झिंक फॉस्फाईडचा सुध्दा अमिषाच्या माध्यमातून वापर करता येईल.

(६) पक्ष्यांपासून अन्नधान्याच्या सुरक्षिततेची पुरेशी काळजी घेण्यात यावी.

(७) पुरेशा प्रकाशाच्या दिवशी योग्य वायुविजन असणे अन्नधान्यातील आर्द्रता कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते.

(८) पावसापासून अन्नधान्याचे रक्षण करण्यासाठी खुल्या आवारातील (Covers and Plinth) साठवणीच्या थप्प्या पॉलिथिनच्या आवरणाने आणि नॉयलॉनच्या जाळयांनी आच्छादित कराव्यात व आच्छादने नायलॉनच्या दोराने बांधावीत.

(९) खुल्या आवारात (Covers and Plinth) साठविलेल्या अन्नधान्यास ५० टक्के मॅलाथिऑन फवारुन २.५ टक्के डेस्टामेथ्रीन पावडरच्या सहाय्याने तसेच ॲल्युमिनियम फॉस्फाईडच्या गोळयांच्या सहाय्याने धुरीकरण करुन अन्नधान्याच्या साठवणूकीतील किडीपासून संरक्षण करावे.

(१०) वा-याच्या वेगामूळे किंवा इतर कारणाने आवरणाची हानी झाल्यास तात्काळ उपयोगासाठी काळया पॉलिथिन आवरणाचा व नायलॉनच्या दोराचा पुरेसा साठा ठेवण्यात यावा.

(११) खुल्या आवारात (Cover and Plinth) साठविलेल्या धान्याचे प्राथम्याने नियतन द्यावे/वितरण करावे.

३. भविष्यात अशाप्रकारे अन्नधान्याची खुल्या जागी (Open place) साठवणूक करावी लागल्यास त्या अन्नधान्याचे नुकसानीपासून रक्षण करण्यासाठी उपरोक्त परिच्छेद -२ मध्ये विहित केलेल्या उपयोजन संहितेचे पालन करण्यात यावे.

४. याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात व त्याचे पालन होत असल्याची खात्री करण्यात यावी.

सही/-
(श्या. द. शिंदे)
उप सचिव,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

प्रत अग्रेषित -

१) महाराष्ट्र राज्य पणन महासंघ, मुंबई.
२) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
३) सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.